On Permanent Unaided Basis
(English Medium)

sample 2

Pune Zilla Parishad,
Pune Yashwantrao Chavan Bhawan
Department of Education (Primary)
Ja.No.G.P. Education/Pr./Kha pra sha /232/2022
Pune-1 Dated - 17/02/2022

To,

President/Secretary/Principal,
Swami Vivekananda Education Broadcasting Board, Gandharvanagari, Moshi, Pune. 412105
Sanchalit Gayatri English Medium School, Gandharvanagari, Moshi, Pune-41105

Subject :- For the purpose of Section 18 of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009, regarding the granting of recognition certificates to schools under Rule 11, sub-rule (4) of the Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011.

Based on your application and subsequent correspondence with the school / inspection of the school, I am the Education Officer (Primary), Pune Zilla Parishad, , Pune for Class 1st to 8th from dated 1st April 2019 to 31 March 2022. Swami Vivekananda Shikshan Prasarak Mandal, Gandharvanagari, Moshi 31st March 2022. 412105 Sanchalit Gayatri English Medium School, Gandharvanagari, Moshi, Pune-41105
Granting provisional recognition to the school.

The above approval is subject to fulfillment of the following conditions.

1. No extension of matriculation period and no obligation to grant recognition or affiliation after Class VIII If not,

2. The Free and Compulsory Education of Children Act, 2009 (Appendix One) and the Maharashtra Free and Compulsory Education of Children Act, 2009
The school shall comply with the provisions of the Right to Education Rules, 2011 (Annexure Two).

3. The school shall admit children belonging to the nearest weaker sections and disadvantaged groups, in the first grade, to the extent of at least 25% of the number of students in that grade and provide free and compulsory education to them till the completion of primary education provided that this standard is also complied with in respect of pre-primary grades.

4. That the school receives reimbursement under section 12(2) of the Act for the children specified in paragraph 3.
A separate bank account will be provided to the school for reimbursement

5. The institution/school shall not collect capitation fee and shall not compel the child or his or her parent or guardian for any screening process. ,

6. No child shall be denied admission to school for lack of proof of age, religion, caste or race, place of birth or any of these,

7 (a) No child admitted to a school shall be retained in the grade in which he belongs or expelled from the school until the completion of primary education.

(ii) No child shall be subjected to corporal punishment or mental torture.

(3) No driver shall be required to pass any board examination until completion of primary education.

(iv) A certificate prescribed under rule 23 shall be issued to a child who has completed primary education.

(five) Students with disabilities / special needs will be included as per the provisions of the Act.

(six) Teachers possessing the minimum qualification prescribed under section 23(1) of the Act shall be appointed. But further, the teachers who do not hold the minimum qualification on the date of commencement of the Act
A minimum qualification period of 5 years has to be completed.

(vii) the teacher performs his/her duties specified in section 24(1) of the Act, and

(viii) The school shall ensure that the teacher does not engage himself in private tutoring.

NOTARY
SANJANA SACHIN MANE
Pimpri, Pune Dist.
Reg. No. 15845
Exp. Dt.20/11/2024
GOVERNMENT OF INDIA

8. The school shall follow the syllabus prepared on the basis of the syllabus prescribed by the appropriate authority.

9. School, the provision of facilities to students compared to the facilities available in the school as prescribed in section 19 of the Act, previous Children

10. The school shall adhere to the standards and norms specified in section 19 of the Act.

The facilities available in the school at the time of inspection were as follows:-

- Sk. F
- Area of school premises: 1832.33 sq.m
- sk. foot 1703.44 sq.m
- The field of rune cultivation.
- Area of Jaggery Ground.:- 2000 sq. m Sq. ft
- Number of Burg Rooms :- 20 class rooms
  - Office-cum-storage-cum-principal's room. :- 3 class rooms
- Are there separate toilets for boys and girls? :-

| | girls | boy |
|---|---|---|
| bathroom - | 6 | 6 |
| washroom- | 15 | 15 |

- Drinking water facility is available. Yes
- Kitchen to cook meals for dual: Not applicable
- Availability of teaching study materials / sports and sports materials / library. (Library Book No-1200, Periodicals/Newspapers:6)

11. Unapproved classes or units shall not be conducted in the school premises or elsewhere in the name of the school.

12. The building or other structure or playground shall be used only for the purpose of education and skill development.

13. The School Societies Registration Act, 1860 (21 of 1860) or the Bombay Public Trustees Act, 1950
It is being run through a registered organization.

14 The school is not run for the benefit of any person, group or body of persons or any other person or for making any profit,

15. The leases should be audited and certified by the Chartered Accountant and proper accounts as per rules Statements should be prepared, one copy of each statement of accounts should be sent to the District Education Officer every year.

16. Your school's accreditation score is low. Also the U-DISE No.27252003115 of your school. In any correspondence with this office please
It should be noted that Namah should be performed.

17. The school shall submit such reports and information as the Director of Education / District Education Officer may demand from time to time or the Government for the continuous fulfillment of the condition of recognition of the school or for rectifying the errors in the functioning of the school.
or comply with such instructions as may be given by the local authority,

18. To ensure that the registration of the organization is renewed, if any. 19. As per Appendix 'Three', other conditions are appended hereto,

ABhagwat
MANAGER
Gayatri English Medium School
Gandharvnagari, Moshi, Pune-412105

for Jyoti
Principal
Gayatri Eng. Med. School
Moshi

Sd /-
Kamlakar Randive
Education Officer (Primary)
Pune Zilla Parishad, Pune

BEFORE ME
S.S. mane
05/01/2024
SANJANA SACHIN MANE
ADVOCATE & NOTARY
GOVERNMENT OF INDIA
Kalewadi. Pimpri, Pune Dist
05/01/24

NOTARY GOVERNMENT OF INDIA SANJANA SACHIN MANE Pimpri, Pune Dist. Reg. No. 15848 Exp. Dt. 28/11/2024

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

# नमुना 2

कायम विनाअनुदानित तत्वावर
(इंग्रजी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ./खाप्राशा/ 232/2022
पुणे-1 दिनांक - 17/02/2022

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ,गंधर्वनगरी,मोशी,पुणे.412105 संचलित गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूल,गंधर्वनगरी,मोशी,पुणे-41105

विषय :- **बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,2011 याचा नियम 11, पोट नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.**

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे. मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे दिनांक 1 एप्रिल 2019 ते पासून दिनांक 31 मार्च 2022 पर्यंत इ.1 ली ते 8 वीसाठी स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ,गंधर्वनगरी,मोशी,पुणे.412105 संचलित गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूल,गंधर्वनगरी,मोशी,पुणे-41105 शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.**

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

2.बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, 2009(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम, 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतुदींचे शाळा पालन करील.

3.शाळा नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

4.परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

5. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

6 .कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म,जात किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव,शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

7(एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन)कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार)प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

(पाच)विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल, परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/ तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडती, आणि

(आठ) शिक्षकाने /शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

MANAGER
Gayatri English Medium School
Gandharvnagari, Moshi, Pune-412105

Principal
Gayatri Eng. Med. School
Moshi

Scanned with OKEN Scanner

8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

9. शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

10.शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्धअसलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ : 1832.33 चौ.मी स्के.मी
- एकूण बांधकामाचे क्षेत्र. 1703.44 चौ.मी स्के.फुट
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ.:- 2000 चौ.मी स्के.फुट
- वर्ग खोल्यांची संख्या. :- 20 वर्ग खोल्या
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली. :- 3 वर्ग खोल्या
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत काय ? :-

| | मुले | मुली |
|---|---|---|
| **संडास -** | 6 | 6 |
| **मुताऱ्या-** | 15 | 15 |

- पिण्याच्या पाण्याची सुविधा : **आहे**
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर :- **लागू नाही**
- अध्यापन अध्ययन साहित्य /खेळ व क्रीडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता.:-आहे
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध.:-आहे.( ग्रंथालय पुस्तक संख्या-1200, नियतकालिक/वर्तमानपत्र:6)

11.मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

12.शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13.शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम 1860(1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

14.शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

15.शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

16.तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता सांकेतांक असा आहे.

तसेच आपल्या शाळेचा U-DISE No.27252003115 आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

17.मा. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिंती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

18.संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

19.जोडपत्र 'तीन' नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

17.2.22

**कमलाकर रणदिवे**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
पुणे जिल्हा परिषद, पुणे

A Bhagwat
MANAGER
Gayatri English Medium School
Gandharvnagari, Moshi, Pune-412105

Principal
Gayatri Eng. Med. School
Moshi

Scanned with OKEN Scanner